# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर महानगरपालिकेमार्फत महत्वांकाक्षी प्रकल्प बरेच
**{प्रकल्प विभाग}** दिवसांपासुन राबविण्याचे कार्य सुरु आहे. परंतु यामध्ये अंतीम कोणतेही निष्कर्ष अद्यापपावेतो प्राप्त झालेले नाही. करीता सदर प्रकल्प विहित वेळेत पुर्णत्वास नेण्याकरीता विविध उपाययोजना/प्रयोग व काही प्रकल्पांकरीता प्रकल्प सल्लागारासह बैठका बोलाविण्यात आल्या. यामध्ये बैठकीच्या चर्चेअंती प्राप्त निष्कर्षानुसार असे प्रकल्प राबविण्याकरीता अनुभवी असलेले नामांकित व्यवहार्य सल्लागार (Transaction Advisor (T.A.)) नियुक्त केल्यास, जमीन मुद्रीकरण (Land Monetization) सुलभतेने व कायदया अंतर्गत करता येईल, असा निष्कर्ष निघाला. त्या अनुषंगाने Department of Economic Affairs (DEA) and Department of Investment and Public Asset Management (DIPAM) यांचे Empanelment सल्लागारामधुनच Transaction Advisory म्हणून नियुक्ती करुन सेवा घेण्यात यावी. असा निष्कर्ष निघाल्यामुळे नागपूर महानगरपालिकेतील

१. सक्करदरा, बुधवार बाजार,
२. नेताजी मार्केट, सितीबर्डी.
३. पोहा मार्केट, सतरंजीपुरा,
४. डिग डिस्पेंसरी, व्हि.आय.पी. रोड, धरमपेठ

या उक्त नमुद जागांचा तसेच मनपाच्या अश्याप्रकारच्या इतर जागांचा विकास PPP या तत्वावर विकास करावयाचा प्रस्तावित असल्याने, अशाप्रकारचे महत्वकांक्षी प्रकल्प जलदगतीने राबविण्यास्तव प्रकल्प विभागास, अशा स्वरुपाचे प्रकारचे प्रकल्प राबविणारे सक्षम व अनुभवी Transaction Advisor ची सेवा घेण्याची बाब विचाराधीन होती.

त्या अनुषंगाने अशा Empanelled सल्लागारामार्फत वित्तिय देकाराच्या निविदा बोलावुन निम्नतम प्राप्त वित्तीय देकारावर काम करण्यास तयार असलेल्या सल्लागाराची निवडसुची तयार करुन त्यांना महानगरपालिकेमधे सूचीबध्द (Empanelled) करण्याची प्रक्रिया राबविणे अशा निविदांच्या अटी शर्ती तयार करुन १५ दिवसाच्या कालावधीच्या निविदा बोलाविण्याची व याचे अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान करण्याची बाब विचारात घेणे.

टिप - सविस्तर माहिती नस्तीत उपलब्ध आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 582/मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 25/10/2023

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता, प्रकल्प विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिकेमार्फत महत्वांकाक्षी प्रकल्प बरेच दिवसांपासुन

राबविण्याचे कार्य सुरु आहे. परंतु यामध्ये अंतीम कोणतेही निष्कर्ष अद्यापपावेतो प्राप्त झालेले नाही. करीता सदर प्रकल्प विहित वेळेत पुर्णत्वास नेण्याकरीता विविध उपाययोजना/प्रयोग व काही प्रकल्पांकरीता प्रकल्प सल्लागारासह बैठका बोलाविण्यात आल्या. यामध्ये बैठकीच्या चर्चेअंती प्राप्त निष्कर्षानुसार असे प्रकल्प राबविण्याकरीता अनुभवी असलेले नामांकित व्यवहार्य सल्लागार (Transaction Advisor (T.A.)) नियुक्त केल्यास, जमीन मुद्रीकरण (Land Monetization) सुलभतेने व कायदया अंतर्गत करता येईल, असा निष्कर्ष निघाला. त्या अनुषंगाने Department of Economic Affairs (DEA) and Department of Investment and Public Asset Management (DIPAM) यांचे Empanelment सल्लागारामधुनच Transaction Advisory म्हणून नियुक्ती करुन सेवा घेण्यात यावी. असा निष्कर्ष निघाल्यामुळे नागपूर महानगरपालिकेतील

१. सक्करदरा, बुधवार बाजार,

२. नेताजी मार्केट, सितीबर्डी.

३. पोहा मार्केट, सतरंजीपुरा,

४. डिग डिस्पेंसरी, व्हि.आय.पी. रोड, धरमपेठ

या उक्त नमुद जागांचा तसेच मनपाच्या अश्याप्रकारच्या इतर जागांचा विकास PPP या तत्वावर विकास करावयाचा प्रस्तावित असल्याने, अशाप्रकारचे महत्वकांक्षी प्रकल्प जलदगतीने राबविण्यास्तव प्रकल्प विभागास, अशा स्वरुपाचे प्रकारचे प्रकल्प राबविणारे सक्षम व अनुभवी Transaction Advisor ची सेवा घेण्याची बाब विचाराधीन होती.

त्या अनुषंगाने अशा Empanelled सल्लागारामार्फत वित्तिय देकाराच्या निविदा बोलावुन निम्नतम प्राप्त वित्तीय देकारावर काम करण्यास तयार असलेल्या सल्लागाराची निवडसुची तयार करुन त्यांना महानगरपालिकेमधे सूचीबध्द (Empanelled) करण्याची प्रक्रिया राबविणे अशा निविदांच्या अटी शर्ती तयार करुन १५ दिवसाच्या कालावधीच्या निविदा बोलाविण्याची व याचे अधिकार मा. आयुक्त यांना प्रदान करण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**डॉ. अभिजीत चौधरी (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**